दुरध्वनि/फॅक्स 07137-295053
भ्रमणध्वनी क्र..9130158581

सत्यमेव जयते
समादेशक कार्यालय
राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, विसोरा
ता. वडसा (देसाईगंज) जि.गडचिरोली ४४१२०७
E-mail : cmdt.srpf13.nagpur@mahapolice.gov.in

**क्रमांक** : **गट**-13/**आशा**-1/**पोभ**.2022-23/ 4500 /2024 **गडचिरोली** **दिनांक** : 13/07/2024

**राज्य राखीव पोलीस बल गट क्र**.13, **विसोरा**, **ता.वडसा** (**देसाईगंज**), **जि.गडचिरोली**
**सशस्त्र पोलीस शिपाई भरती** 2022-23

## -: लेखी चाचणीबाबत उमेदवारांकरीता सुचना :-

राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, विसोरा, ता.वडसा (देसाईगंज) जि.गडचिरोली च्या आस्थापनेवरील सन २०२२-२३ ची सशस्त्र पोलीस शिपाई संवर्गात रिक्त असलेली १८९ पदे भरण्यासाठीची भरती प्रक्रिया राबविण्यात येत असुन भरती प्रक्रियेची आवेदन अर्ज पडताळणी/ शारीरिक तपासणी/ मैदानी चाचणीबाबत कार्यवाही राज्य राखीव पोलीस बल गट क्र.१३, विसोरा, ता.वडसा (देसाईगंज) जि.गडचिरोली च्या कवायत मैदानावर दिनांक-१९/०६/२०२४ पासुन दिनांक-०१/०७/२०२४ पर्यंत घेण्यात आली आहे.

या गटआस्थापनेवरील रिक्त असलेल्या १८९ पदाकरीता प्रवर्गनिहाय/ समांतर आरक्षण निहाय १:१० याप्रमाणे १९२२ उमेदवार लेखी चाचणी पात्र झाले आहेत. लेखी चाचणी करीता पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा खालील नमुद तक्त्याप्रमाणे दिनांक १७/०७/२०२४ रोजी घेण्यात येणार आहे.

करीता उमेदवारांनी त्यांना लेखी चाचणीकरीता प्राप्त झालेल्या प्रवेशपत्रावर नमुद केलेल्या परिक्षा केंद्रावर सकाळी ०९.०० वाजता न चुकता हजर राहावे.

| **अ.क्र.** | **लेखी परिक्षेचे स्वरुप** | **एकुण प्रश्न** | **एकुण गुण** | **परिक्षा कालावधी** | **परिक्षेचा दिनांक व वेळ** |
|---|---|---|---|---|---|
| १ | **पेपर क्रमांक-१**<br>**अंकगणित, सामान्य ज्ञान व चालु घडामोडी, बुद्धीमत्ता चाचणी, मराठी व्याकरण** | १०० | १०० | ९० मिनिटे | १७/०७/२०२४ सकाळी ११.०० ते १२.३० वा.पर्यंत |
| २ | **पेपर क्रमांक-२**<br>**गोंडी आणि माडीया भाषेची लेखी परिक्षा**<br>[वाक्यरचना/भाषांतर-(अ) गोंडी ते मराठी भाषा व मराठी ते गोंडी भाषा, (ब) माडीया ते मराठी व मराठी ते माडीया भाषा] | १०० | १०० | ९० मिनीटे | १७/०७/२०२४ दुपारी ०१.३० ते ०३.०० वा.पर्यंत |

**( विवेक मासाळ )**
समादेशक
रा.रा.पो.बल गट क्र.13, विसोरा,
ता.वडसा (देसाईगंज) जिल्हा गडचिरोली